# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६३ दिनांक ०५/०७/२०२१

## वाणगांव पोलीस ठाणे यांचेकडुन अवैध दारु विक्री करणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक ०४/०७/२०२१ रोजी ०७.३० वाजताचे सुमारास वाणगांव पोलीस ठाणे हद्दीत प्रोव्हीबिशन गुन्हयांचा माल विक्री करिता बाळगला असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. पोउनि./अल्पेश विशे यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता एका मोकळया जागेत तसेच मौजे गुंगवाडा ता.डहाणु येथिल मच्छीमार्केट जवळ चिंचेच्या झाडाखाली यातील आरोपीत याने वेगवेगळया कंपणीच्या देशी व विदेशी प्रोव्हीबिशन गुन्हयाचा माल विनापरवाना, बेकायदेशिररीत्या विक्री करण्याकरीता स्वत:जवळ बाळगला असताना मिळुन आला. आरोपीत याचे ताब्यातुन खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुन आला. १) ७७,२८०/- रुपये किंमतीचे एकुण २३ बॉक्स त्यात प्रत्येक बॉक्समध्ये एकुण ४८ इंपीरियल ब्ल्यु कंपनीची १८० मिलीच्या काचेच्या बाटल्या २) १८,०००/- रुपये किंमतीचे एकुण ५ बॉक्स त्यात प्रत्येक बॉक्समध्ये एकुण १२ रॉयल स्टॅग कंपनीची ७५० मिलीच्या काचेच्या बाटल्या ३) ९०,०००/- रुपये किंमतीची सफेद रंगाची टाटा इंडीगो कंपनीची एमएच-०४ सीजे-१३८० असे वर्णनाची कार असा एकुण १,८५,२८०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचे आरोपीत यांचेविरुद्ध वाणगांव पोलीस ठाणे गुन्हा गु.रजि.क्र.५१/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(फ) प्रमाणे, दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई सपोनि/श्रीकांत शिंदे, प्रभारी अधिकारी वाणगाव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि./अल्पेश विशे, वाणगाव पोलीस ठाणे यांनी व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner